**उपसा सिंचन योजनांच्या**
**संकल्पनासंबंधी मार्गदर्शक सूचना**
**मान्यतेसाठी मसुदा**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन परिपत्रक क्र. मसंसं-०२०८/(८३/२००८) मोप्र-१**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : २४.०३.२००८**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यातील, प्रवाही सिंचनापासून वंचित क्षेत्रांसाठी, जलसंपदा विभागांअंतर्गत, मोठया प्रमाणात उपसा सिंचन योजना राबविण्यात येत आहेत. विविध नदी खो-यातील शेतकरी व लोकप्रतिनिधींच्या सततच्या होणा-या मागण्यांना अनुसरुन उपसा सिंचन योजनांचे नियोजन व बांधकामे चालू आहेत. गेल्या १५ ते २० वर्षात कार्यान्वित होऊन सिंचन चालू असलेल्या उपसा सिंचन योजनांचा अनुभव लक्षात घेवून मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या २००१-०२ मध्ये वार्षिक संकल्पचित्र कार्यक्रमाच्या दिनांक १२-१०-२००१ रोजी झालेल्या बैठकीत, उपसा सिंचन योजनांच्या संकल्पनप्रणाली / दिशा या बाबत सांगोपांग चर्चा करण्यात आली. या बैठकीत ठरल्याप्रमाणे उपसा सिंचन योजनांच्या नियोजन व संकल्पनाबाबत मार्गदर्शक सूचना बैठकीच्या कार्यवृत्ताव्दारे प्रसारित करण्यात आल्या. तसेच सदर मार्गदर्शक सूचनांचे अनुपालन करण्याबाबत शासन पत्र क्र.एम.सी.एम-१०.०१/३७९९८/(५७/२००१) यां, दिनांक ५.७.२००२ अन्वये निर्देशित करण्यात आले.

यापूर्वी उपसा सिंचन योजनांच्या नियोजन व संकल्पन विषयक धोरणात्मक निर्णय, शासन स्तरावरील या कामी विशेष गठित स्थायी समिती मार्फत घेण्यात येत असत. तथापि विविध पाटबंधारे विकास महामंडळांच्या स्थापनेनंतर, उपरोक्त शासन स्तरावरील स्थायी समिती जुलै २००२ मध्ये संपुष्टात आली. तदनंतर उपसा सिंचन योजनांच्या पंपिंग यंत्रसामुग्री निविदांना मान्यता देणे, इतर तांत्रिक बाबी व उपसा सिंचन योजनांच्या अंमलबजावणी कामी संबंधित कार्यकारी संचालकांच्या अध्यक्षतेखाली, प्रत्येक पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत स्वतःची स्थायी समिती गठित करण्यात आली.

सद्यःस्थितीत उपसा सिंचन योजनांबाबत नियोजन व संकल्पनासंबंधी सध्याच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१) उपसा सिंचन योजनांकरिता संकल्पित विसर्ग, हा सुधारित पेनमन पध्दतीने (१२ दिवस वहन कालावधी व २ दिवस बंद धरुन) काढण्यात यावा.

२) २४ तास पंपिंग व १४ दिवस आवर्तन कालावधी धरण्यात यावा.

३) संकल्पित विसर्ग हा महत्तम विसर्गाच्या ७०टक्के घेण्यात यावा.

४) अतिरिक्त पंपाची तरतूद वगळण्यात यावी.

५) सर्व नियोजनाधीन उपसा सिंचन योजनांचे संकल्पन (सर्वसाधारण आराखडयासह) योजना व्यवहार्यतेने राबविण्याच्या दृष्टीने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून तपासणी करुन घेण्यात यावी. तथापि म.सं.चि.सं नासिक

यांचेकडे विविध पाटबंधारे विकास महामंडळाकडून संकल्पनासाठी / तपासणसाठी प्राप्त होत असलेल्या किंबहुना एकाच महामंडळाकडील उपसा सिंचन योजनांच्या संदर्भात, काही योजना महत्तम (१०० टक्के) विसर्गासाठी तर इतर योजना महत्तम विसर्गाच्या ७० टक्के विसर्गासाठी संकल्पित करण्यात येत आहेत.

## परिपत्रक

उपसा सिंचन योजना, तांत्रिक दृष्टया व्यवहार्य, आर्थिक दृष्टया किफायतशीर , सामाजिक दृष्टया स्वीकृत व पर्यावरणाच्या दृष्टीने टिकाऊ होण्यासाठी, तसेच नियोजन व संकल्पनात एकसूत्रीपणा येण्यासाठी खालील मार्गदर्शक सूचनांचे सर्व पाटबंधारे विकास महामंडळांकडून काटकोरपणे पालन होण्याकरिता त्या पुनश्च निर्गमित करण्यात येत आहेत.

**मार्गदर्शक सूचना**

१. सर्व प्रकारच्या उपसा सिंचन योजनांच्या मान्यताप्राप्त लाभक्षेत्रासाठी संकल्पित विसर्ग हा सुधारित पेनमन पध्दतीने (१२ दिवस वहन कालावधी व २ दिवस बंद धरुन) येणा-या महत्तम पंधरवाडी पाण्याच्या मागणीवर आधारित विसर्गाच्या ७० टक्के इतका घेण्यात यावा.

२. आवर्तन कालावधी १४ दिवस व १६ तास पंपींग करण्यात यावे.

३. अतिरिक्त पंपाची तरतूद करण्यात येऊ नये.

४. सर्व नियोजनाधीन उपसा सिंचन योजनांचे सर्वसाधारण आराखडे तांत्रिक व्यवहार्यतेच्या दृष्टीने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या तपासणीनंतरच सक्षम स्तरावर मान्यता व्हावी.

**( ता. ना. मुंडे )**
शासनाचे उप सचिव

प्रत,

स्वीय सहायक, मा. मंत्री, जलसंपदा विभाग (म.कृखोरे विकास महामंडळ वगळून),
स्वीय सहायक, मा. मंत्री, जलसंपदा विभाग म.कृखोरे विकास महामंडळ ,
स्वीय सहायक, मा.राज्यमंत्री, जलसंपदा विभाग,
स्वीय सहायक, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
स्वीय सहायक, सचिव (ज.सं.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
स्वीय सहायक, सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण व संशोधन, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक,
सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,
सर्व तांत्रिक उप सचिव/अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व उप अभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
कार्यासन मोप्र-१, संग्रहार्थ.